PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 1

# तरूणाच्या आत्महत्येची कारणे व उपाय

**श्री. वाघमारे मारोती देविदास**
एम.ए.बी.एड्.नेट (समाजषास्त्र)
**(महाराष्ट्र) भारत**

## प्रस्तावना :

आज उदारीकरण,जागतिकीकरण,विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे भारतीय समुदायात उल्लेखनीय विकास होत असला तरी समाजातील अनेक समकालीन प्रश्न व विचलनाच्या विविध समस्या अधिकच वाढत असल्याचे दिसून येत आहे. गेली काही वर्षे महाराष्ट्रामध्ये विदर्भ,मराठवाडा,तसेच आंध्रप्रदेश,कर्नाटक या प्रदेशामध्ये घडणा-या शेतक-यांच्या आत्महत्येच्या करूण आणि खेदजनक बातम्या ऐकत आहोत. कर्जबाजारी, दारिद्रय, उपासमार इ. कारणे त्यामागे असल्याचे दिसून येते. परंतु या जोडीला आता तरूण पिढी विशेषत: विद्यार्थी वर्गाच्या आत्महत्येचे सत्रच चालु झाल्याने समाजात तरूणांच्या आत्महत्या एक अदृश्य जागतिक समस्या म्हणून समोर येत आहे.

आत्महत्या या दुर्दैवी घटनेस जगाच्या पाठीवरील कोणताच समाज,कोणताच देश हा अपवाद नाही समाजात अनेक शतकापासून अशा घटना घडत आहेत. आपण केवळ चिंताग्रस्त होऊन भागणार नाही. समाज, शासन प्रत्येक देशाचा प्रगल्भ नागरिक, पालक ,शिक्षक, शिक्षण संस्था यांनी अंतर्मुख होऊन या बाबत विचार करणे ही सर्वासमोरील आव्हान बनलेले आहे. भारतात हजारो वर्षापूर्वी नालंदा, तक्षशिला यासारखी महान विद्यापीठे ज्ञानदानाचे कार्य करत एकाच वेळी दहा ते वीस हजार विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत असत त्या काळातील विद्यार्थी आत्महत्या करत होते, असा कुठल्याच ग्रंथात अल्लेख नाही. पण आज मात्र हे चित्र पलटलेले आहे. म्हणुन चुकले कुठे? कोणचे? याची उत्तरे शोधलीच पाहीजेत. तरूणांना आत्महत्येस प्रवृत्त करण्यासाठी कोणती परिस्थिती कारणीभुत आहे? त्यांना समाजात कोणत्या समस्या भेडसावतात? रोजच्या-रोज या घटनांची संख्या का वाढत आहे? तरूणांच्या आत्महत्येचे दुर्दैवी सत्र कसे थांबवावे यामागील कारणे कोणती? याची उत्तरे शोधलीच पाहीजेत.

**आत्महत्येची संकल्पना :**

**आत्महत्येचा अर्थ —** 'आत्महत्या' धर्म आणि न्याय यांनी निषिध्द मानलेल्या मार्गाने स्वत:च्या मरणास कारण होणे. हेतुपुरस्पर स्वत:चा जीव स्वत: देणे. आत्मघात,आत्मनाश धर्मशास्त्राप्रमाणे आत्महत्या हे पाप असून कायद्याने तो गुन्हा ठरविला आहे.(संदर्भ : मराठी शब्द कोश खंड पहिला पान क्र. २६८)

आत्महत्या मृत्युचा असा एक प्रकार आहे की ज्यात बळी जाणारी व्यक्ती सकारात्मक किंवा नकारात्मक क्रियाद्धारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वत: मृत्यूला कवटाळते (संदर्भ : सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिध्दान्ताचा कोश डॉ.बी.आर.जोशी पान क्र. ७८३)

**व्याख्या —इन्सायक्लोपीडीया ऑफ ब्रिटानिका :**"स्वत:चे जीवन स्वेच्छेने जाणीवपूर्वक संपविणे म्हणजे आत्मनाश किंवा आत्महत्या होय."

**एमिल डरखिम :** "प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे होकारात्मक किंवा नकारात्मक कृतीचा शेवट मृत्यूत होतो, अशी व्यक्तीकडून घडणारी कोणतीही कृती म्हणजे आत्महत्या होय."

**आत्महत्या म्हणजे काय? —**"आपणच आपले जीवन मुद्दामहून संपविणे यास आत्महत्या असे म्हणतात." आत्महत्या सकारात्मक व नकारात्मक क्रिया आहे. देशासाठी युध्दात गोळया खाऊन मृत्युला सामोरे जाणारा देशभक्त आणि घरातील पंख्याला गळफास लाऊन जीव देणारा या दोघांचीही आत्महत्याच आहे. यात स्वच्छेने जाणीवपुर्वक आत्मघात केलेला असतो.याऊलट रस्त्याने चालताना मोटारगाडीच्या धक्याने मृत्यू झाल्यास किंवा अनावधानाने विजेचा धक्याने मृत्यू झाल्यास अकाली निधन होईल. म्हणजेच स्वच्छेने जाणीवपुर्वक जीवन संपवने म्हणजे आत्महत्या होय.

**उद्दिष्टे :** १) तरूणांच्या आत्महतेच्या कारणांचा सैधांतिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

२) तरूणांच्या आत्महत्येमागील कारणांचा शोध घेणे.

३) तरूणांच्या आत्महत्येचा परिणाम जाणून घेणे.

**गृहितकृत्ये :**

१) वाढत्या ताणतणावामुळे तरूण आत्महत्या करतात.

२) तरूणांच्या आत्महत्येसाठी कौटुंबिक परिस्थिती जबाबदार आहे.

३) तरूणांच्या आत्महत्येचा परिणाम दिसून येतो.

**संदर्भ साहित्य आढावा :**

**शिल्पा अग्रवाल** 'Suicide in India(May 2015)' या शोध निबंधातून भारतातील आत्महत्येचा अभ्यास करूण आत्महत्या हि एक भारतातील प्रमुख समस्या असल्याचे प्रतिपादन केले त्यात प्रामुख्याने तरूण स्त्रीया मोठया प्रमाणात सहभाग असल्याचे स्पष्ट केले. सामाजिक,

आर्थिक, सांस्कृतिक, मानसिक विविध कारणामुळे आत्महत्या घडण्याचे कारण स्पष्ट केले आहे. **अमिन वानी,डॉ. आर. शंकर,बिनशाद एम.,नर्गिस एस. अनिचाम जे.** यांनी 'A Study of Suicideal Tendency Among Annamulcy University Students (Jun 2016)' या शोध प्रबंधात विद्यापिठातील कला,विज्ञान शाखेतील मुले आणि मुली यांच्या प्रवृत्तीचा अभ्यास करूण विज्ञान शाखेतील मुलींचे प्रमाण जास्त व कला शाखेतील मुलींचे प्रमाण अधिक असल्याचा अभ्यास केला.परिक्षेतील अपयशामुळे आत्महत्या घडून येतात असे प्रतिपादन केले. **श्रीमती मुरूदुला महाजन** (Feb 2016) यांनी 'Suicidal Tendencies Amongst Adolescents' या शोध प्रबंधात शाळेत जाणा[illegible]या मुलांचा अभ्यास करूण १५[illegible]२५ वयोगटातील मुले अधिक आत्महत्येचा प्रयत्न करतात असे प्रतिपादन केले आहे. अपयश, निराशा, ताण इत्यादी कारणामुळे आत्महत्येचा प्रयत्न करत असल्याचे प्रतिपादन केले. **अँटनी स्प्रिटो इट अल** (२००२) यांनी आत्महत्येस प्रवृत्त करणारे प्रमुख जबाबदार घटकाचा अल्लेख करताना स्पष्ट करतात की,आत्महत्येचा प्रयत्न करणारे तरूण भावनिक, निराश, कौटुंबिक संघर्ष, संसर्ग या परिस्थितीत किशोरवयनांमध्ये आत्महत्येचा प्रभाव अधिक दिसून येतो. **राहूल शर्मा,विजय ग्रोवर आणि संजय चतुर्वेदी** यांनी 'Suicida behaviour amongst adolescent student s in South Delhi' या शोध निबंधात किशोरवयीन विद्यार्थ्यामध्ये आत्महत्येचा प्रभाव दिसून येण्याचे प्रमुख कारण अभ्यासाचा मानसिक ताण किशोरवयीन तरूणांमध्ये आत्मघाती वर्तन उच्च असल्याचे स्पष्ट केले आणि सार्वजनिक आराग्याची चिंता घेतली पाहिजे असा निष्कर्ष काढण्यात आला. **एलेन इनग्रम** (१९९२) यांनी आपल्या 'Area of Societat attitudes towards Suicide behaviour' या शोध प्रबंधात पोगंड अवस्थेतील तरूणामध्ये आत्महत्या करण्याचा प्रयत्न लक्षणिय आहे. त्याच्यात शारीरीक आरोग्याची चिंता,मानसिक समस्या आणि आर्थिक टंचाई यामुळे आत्महत्येचा प्रयत्न केला जातो. तसेच सांस्कृतिक, सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, जाखिम घटकाचा आत्महत्येशी संबंध असल्याचे प्रतिपादन केले आहे. J.CHAVANAGH (२००३) :यांनी संशोधनपर अभ्यास करूण एक संदेश दिला आहे. 'मानसिक विकार' हा सर्वात प्रभावी घटक आत्महत्येस प्रवृत्त करणारा असल्याने भविष्यात मानसिक विकार व मानसिक घटकाचा प्रतिबंध करावा असे प्रतिपादन केले. **सुधिर के.व्ही.,डॉ,ए.सेतुराम सुबय्या** (July 2013–Incidents of Suicide Among Youth in Kerala) या शोध प्रबंधात कन्नुर जिल्हयातील महाविद्यालयीन,शाळा,कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या प्रवृत्तीचा अभ्यास करूण ८०% विद्यार्थी परीक्षेच्या निकालाच्या मानसिक ताणामुळे आत्महत्या घडून येतात असे प्रतिपादन केले.

**संशोधन पध्दती :**

'तरूणाच्या आत्महत्येची कारणे व उपाय' या विषयाचे अध्ययन करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब केला आहे. संशोधन विषयाची संबंधीत माहिती संकलित करताना वर्तमान पत्रे, मासिके, शासकिय व निमशासकिय नोंदी, अहवाल, संशोधान विषयाशी संबंधीत संदर्भ ग्रंथ, पुस्तके व तसेच इंटरनेट इ. माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**तथ्याचे विश्लेषण :**

**आत्महत्येचा इतिहास :** प्राचीन अथेन्समध्ये राज्य सरकारच्या मुंजुरिशिवाय आत्महत्या करणाऱ्या व्यक्तिस सामान्य दफनाने सन्मानित करण्यात आले होते. प्राचीन रोम मध्ये आत्महत्येस सुरूवातीस परवानगी होती. नंतर आर्थिक खर्चामुळे त्याला राज्य विरूध्द गुन्हा समजला गेला.प्लॅटो व्दिपक्षीय असताना ॲरिस्टॉटलने सर्व प्रकारच्या आत्महत्येचा निषेध्द केला. १९ व्या शतकापर्यंत,आत्महत्या पाप असल्याचे पाहिले जात असे.१८७९ इंग्रजी कायद्यानुसार आत्महत्या आणि खून यातील फरक करण्यात आला. १८८२ मध्ये मृत्यूनंतर इंग्लंडमध्ये डेलाइट दफन करण्याची परवानगी दिली.आणि २०व्या शतकात आत्महत्या करणारा शब्द उदयास आला. (संदर्भ:विकिपीडिया)

**आत्महत्येचा सिध्दांत :** आत्महत्येचा संबंध प्राचीन हिंदु धर्मसुत्रात सांगितलेला आहे. इ.स. पूर्वी गौतम बुद्धांनी देहदंडाच्या सर्व प्रकाराचा व धार्मिक आत्महत्येचा निषेध केला आहे. परंतु जैन धर्माने आत्महत्येला मात्र सहमती दिली असून त्यांचा पुरस्कारही केला आहे. आत्महत्येसंबंधीची माहिती धार्मिक ग्रंथात दिसून येते.**(संदर्भ केतकर ज्ञानकोश खंड २ आत्महत्या)** प्रामुख्याने आत्महत्येचा सिद्धांत १९ व्या शतकात पाश्चिमात्य विचारवंत एमिल दुर्खिमने इ.स. १८९७ मध्ये लिहिलेल्या Lee Suicide या ग्रंथात आत्महत्येचा सिद्धांत मांडला त्यांचा आत्महत्या सिद्धांत समाजशास्त्रीय अध्ययनात महत्वपुर्ण शोधग्रंथ समजला जातो. आत्महत्या हा ग्रंथ संशोधनावर आधारित असून सांख्यिकिय पद्धतीने आकडेवारी गोळा करूण वस्तुनिष्ठतेच्या आधारावर त्याने युरोपाच्या अनेक देशातील आकडेवारीला एकत्रित केले. त्यांनी आत्महत्या ही सामाजिक घटना संबोधुन त्याचे स्वरूप,प्रकार आणि कारणे सांगितली आहेत. एलिम दुर्खिमने आत्महत्येचे सामाजिक जीवनाशी संबंध जोडून आधुनिक समाजातील व्यभियुक्त पैलु शोधले आहेत. त्यांनी ग्रंथात तुलनात्मक पद्धतीचा वापर करून धर्म,लिंग,कुटुंब,आर्थिक परिस्थिती,वैवाहिक दर्जा आणि आत्महत्येचा प्रथम सांख्यिकिय पद्धतीने संबंध सांगितला आहे. एमिल दुर्खिम यांनी मांडलेला आत्महत्येचा सिद्धांत समाजशास्त्राच्या इतिहासात एक सर्वात महत्वाचे योगदान मानले जाते.

**एमिल दुर्खिमचा आत्महत्येचा सिद्धांत :—** यांनी आत्महत्येच्या संदर्भात १८९७ मध्ये लिहिलेल्या 'The Suicide' या ग्रंथात आत्महत्येसंबंधीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातुन त्यांनी अन्य सिद्धांताना नाकारून 'आत्महत्या ही एक सामाजिक घटना मानली आहे' आत्महत्या ही एक आत्मविनाशाची प्रक्रिया आहे हे एमिल दुर्खिम यांना मान्य नव्हते. कारण त्यांच्या मते, आत्महत्येकरिता मानसिक, प्रजातीय,जैविक, भौगोलिक, जलवायु, दारिद्रय, दु:ख, प्रेम, इत्यादी वैयक्तिक कारणे आत्महत्येकरिता कारणीभुत नाहीत तर समाजात सामाजिक एकिकरणच्या अभावामुळे आत्महत्या घडुन येतात असे प्रतिपादन केले. आत्महत्येची संकल्पना मांडताना प्रामुख्याने १) आत्मकेंद्रितता २) परहितवादी ३) प्रमाणकशुन्यता या प्रवाहामुळे लोक आत्महत्या करतात असे. त्यांच्या सिद्धांतातून स्पष्ट केले. **आत्महत्येचा भौगोलिक सिद्धांत:—** या सिद्धांताचे समर्थन करताना प्रामुख्याने वैग्नर, डिग्वेरी, कॉलेरट, डेक्टर, मासेल, फेमिग्वे, क्रॉस, जॉकेट, हरीग्टन डायरीच, मॉन्टस्क्यु आणि व्हॉनमेअर या विचारवंतानी हवामान, ऋतु, तापमान पर्जन्यमान

या भौगोलिक घटकाचा आत्महत्येशी संबंध असल्याचे आपल्या विचारातून मान्य केले.व्हॉनमेअर म्हणतो की,'ऋतुतील बदल आणि आत्महत्या यांचा संबंध आहे.उदा : युरोपात हिवाळयात कमी व उन्हाळयात अधिक आत्महत्या घडतात असे. आत्महत्येचा भोगोलिक सिद्धांतचे प्रतिपादन केले **आत्महत्येचा मानसिक सिद्धांत** :—बार्डीच्या दुष्टीने,वेडेपणा व आत्महत्येचा सहसंबंध असुन यामुळे व्यक्ती स्वत:ला संपविण्याची इच्छा होते. आणि फलटेच्या दृष्टीने मानसिक सिद्धांतावर प्रकाश टाकताना असे म्हणतात की, गुणमापनाने मेंदू भावनेच्या आहारी जातो आणि आत्महत्येची इच्छा होते. ब□याचदा व्यक्तीवर मानसिक आघात होतो, प्रिय व्यक्तीचा मृत्यु अपघात सहन न झाल्याने अशावेळी व्यक्ती आत्महत्या करतो. त्याचबरोबर मतीमंद व्यक्ती भीती,संकट,अपमान,निराशा यापासून मुक्त होण्यासाठी व मृत्युचा मानसिक मोह असलेल्या व्यक्ती आत्महत्या करतात. तर अश्याप्रकारचा मानसिक सिद्धांत आहे. **आत्महत्येचा अनुकरण सिद्धांत** :—गॅब्रियल टाडे या मानसशास्त्रीय विचारवंताच्या दृष्टीने,अनुकरणामुळे आत्महत्या घडते या मताशी क्लेटलेर म्हणतो की, अनुकरण ही मानसिक प्रक्रिया व पुनरावृत्ती आहे ती संक्रमित रोगाप्रमाणे पसरते. म्हणून पिनेलच्या मते,इमोटसच्या पुजाराने आत्महत्या केली की, अनेकांनी आत्महत्या केल्या व हा संसर्गजन्य रोगासारखा प्रकार घडला असे आत्महत्येचा अनुकरण सिद्धांत स्पष्ट करतात.

**आत्महत्येचे प्रकार** : १) पॅरा—सुईसाइड : ग्रीक भाषेत Para या शब्दाचा अर्थ 'सदृश','जवळचा' असा होतो. म्हणजेच आत्महत्येप्रमाणे वाटणारे व स्व—इजा करणारे असे जे वर्तन, त्यास पॅरा—सुईसाइड असे म्हणतात. प्रत्यक्षात मृत्यु यावा असे या व्यक्तिच्या मनात नसते; परंतु स्वजन, समाज यांना धमकी देण्याचा हेतु असतो. २) सेनीसाइड : अर्थात वृध्दाने केलेली आत्महत्या होय. आर्थिक अडचणी,एकाकीपणा, दीर्घ आजार, आप्त आणि समाजाकडून केले गेलेले अपमान. या कारणामूळे आत्महत्येचा अवलंब केलेला आढळते. ३) खूनी आत्महत्या : स्वत:बरोबर एक किंवा अधिक व्यक्तिचा प्राण घेतला जातो. तेव्हा त्यास मर्डर सुसाईड असे म्हणतात. ४) सामुहिक आत्महत्या : एखांदया धर्मगुरूची चूकीची शिकवण अथवा प्रभावामूळे एकाच वेळेस, अनेक व्यक्ती एकदम आत्महत्या करातात, तेंव्हा त्यास सामुहिक आत्महत्या म्हणतात. ५) आत्मघाती हल्ला : स्वत:ला 'हयुमन बॉब' करून स्वत:चे आणि इतर व्यक्तीचे जीवन संपविणे या प्रकारची आत्महत्या अमेरिकेतील लादेनमूळे विमानातून केलेले हल्ले हे आत्मघातकी हल्ला होय. ६) रूपांतरीत आत्महत्या : यामध्ये व्यक्ति प्रत्यक्षात स्वत:चा जीव घेत नाही; परंतु राजकिय अथवा आपल्या करीयरच्या संदर्भात एकदमच आपले जीवन जाहिरपणे संपुष्टात आणले जाते. त्यास रूपांतरीत आत्महत्या म्हणतात. ७) ज्युडिशियल सुइसाइड : संशयित गुन्हेगार अथवा आरोपी आपली शिक्षा मानहानी टाळण्यासाठी आत्महत्या करतो. त्यास ज्युडिशियल सुइसाइड म्हणतात. ८) कर्तव्यनिष्ठ आत्महत्या : आपण स्वत: अथवा आपले कुटुंबिय यांच्यावर होणारे अत्याचार, त्यांची बदनामी टाळायची असते. म्हणून आत्महत्या योजली जाते. त्यास कर्तव्यनिष्ठ आत्महत्या म्हणतात. ९) सुटका मिळवून देणारी आत्महत्या : आयुष्यातील निराशा, अपयश, हताश या सर्वातून सूटका करून घेण्यासाठी व्यक्ति आत्महत्या करतो. जगणेच जेंव्हा असह्य होते, त्यावेळेस अश्याप्रकारची आत्महत्या घडत असते. अलीकडे कुमारवयीन विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या याच प्रकारात मोडणाऱ्या आहेत. **आत्महत्या करण्याच्या पध्दती :**

१) फाशी किंवा गुदमरूण घेणे, २) पाण्यात बुडुन,३) उंच ठीकाणावरून उडी मारणे, ४) हाताची नस कापणे, ५) विद्युत उपकरणाच्या सहाय्याने, ६) वाहनाच्या सहाय्याने, ७) बंदुक, ८) विष किटक नाशक, ९) भुकमारी, १०) नीर्जलीकरण, ११) घरगुती वापरातील गॅस.

**आत्महत्येसंबंधिचे विविध दृष्टिकोन :**

**वैद्यकिय दृष्टिकोन :** आधुनिक वैद्यकशास्त्र आणि तज्ज्ञ यांच्या मते व्यक्तिचे मानसिक आरोग्य आणि आत्महत्या करणे, याचा परस्परसंबंध असतो. हताश अथवा तीव्र निराशा यांना तोंड न देता आल्यामुळे एखाद्याचे मानसिक आरोग्य बिघडते. तसेच, सामाजिक तणाव, शैक्षणिक तणाव, विद्यार्थ्यांच्या संदर्भात शैक्षणिक, नैतिक व पालकांच्या अपेक्षांचे न पेलविणारे तणावही कारणीभूत ठरतात. कही जणांकडून आत्महत्येचे केवळ प्रयत्नच केले जातात. परंतु तज्ज्ञांच्या मते, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. विशेषत:, विद्यार्थीदशेतील हे प्रयत्न भविष्यात धोकादायक ठरू शकतात त्यावर त्वरीत उपाय करणे व त्यांना मदत करणे आवश्यक असते. त्यांची मरण्याची इच्छा नसते. यांग्यवेळी योग्य प्रकारचे समुपदेशन मिळाल्यास ते भविष्यात आत्महत्येचे प्रयत्न करत नाहीत.

**धार्मिक व सांस्कृतिक दृष्टिकोन :** प्राचीन हिंदू धर्मामध्ये आत्महत्या हे पाप मानले गेले आहे. अशी व्यक्ति ही पिशाच–योनीमध्ये जन्म घेते, असे ठाम मत व्यक्त केले आहे. इस्लाम धर्मानूसार,आत्महत्या करणारी ही एक प्रकारे प्रत्यक्ष अल्लावर अविश्वास दाखवत असते. याविश्वातील देवांचे अस्तित्व नाकारणे म्हणजेच आत्महत्या करणे होय. जपानमध्ये 'सामुराई' हा एक आत्महत्येचा प्रकार आहे. आपली प्रतिष्ठा गमावलेली स्वाभिमानी व्यक्ति याप्रकारे आत्महत्या करत असत.

**कायदेशीर दृष्टिकोन :** जगाच्या पाठीवरील बहुतेक देशामध्ये आत्महत्या हे कृत्य गुन्हाच मानले जाते. भारत देशात असफल आत्महत्या करणाऱ्या व्यक्तिस कलम (आय.पी.सी. ३०९) गुन्हेगार मानले जाते. तर आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तिस कलम (आय.पी.सी. ३०६) नूसार फौजदारी गुन्हा आहे.

**युवा आणि आत्महत्या :** जगामध्ये दर वर्षी सुमारे ०.५% ते १.४% लोक आत्महत्येने मरतात. १९६० ते २०१२ पर्यंत आत्महत्येचा दर ६०% ने वाढला आहे. जागतिक पातळीवर आत्महत्या ही मृत्युचे १० वे कारण ठरले आहे. जगात सर्वाधिक आत्महत्या या दक्षिण पूर्व आशिया विभागात होतात. अनेक देशामध्ये आत्महत्येचा दर मध्यमवर्गीय किंवा वृध्दामध्ये सर्वाधिक असला तरी १५ ते २९ वयोगटातील तरूण वयोगटातील संख्या सर्वाधिक आहे. जगभरात ज्या तरूणांच्या आत्महत्या होतात त्यापैकी १०% आत्महत्या एकटया भारतात होतात. २०१२ मध्ये देशात सर्वाधिक आत्महत्या झाल्या होत्या जागतिक आरोग्य संघटनेने प्रसिध्द केलेल्या अहवालात दर ४० सेकंदाने भारतात एक आत्महत्या होत असल्याचे म्हटले आहे.(संदर्भ :दैनिक लोकमत ०५. ०९.२०१४) युवा पिढीमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक वाढण्यामागे अनेक कारणे असले तरी काही प्रमुख कारणे शैक्षणिक परिस्थिती पाल्यांची बौधिक कुवत व पाल्यांच्या अपेक्षा यातील तफावत जीवघेणी स्पर्धा व स्पर्धा परिक्षा अवहेलना मारपीट व शिवीगाळ, पिस्तूल, बंदूक व

यासारख्या हत्यारांची सहज उपलब्धता, रॅगींग, प्रेमातील असफलता ई. करणे तरूणा आत्महत्येस प्रवृत्त करतात.

**आत्महत्येची कारणे :**

आत्महत्या मानवी जीवणाचा अंत करणारा वर्तन प्रकार आहे. जागतिक पातळीवर प्रतिवर्षी जे मृत्यु होत असतात, त्यातील आत्महत्या हे १० वे कारण आहे. गेल्या ५० वर्षामध्ये जागतिक पातळीवर आत्महत्येचा दर ६०% वाढला आहे (WHO). यामध्ये युवापीढी; आणि विशेषत: विद्यार्थीवर्गात यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याने ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. यासाठीच त्यामागील कारणांचा सविस्तर विचार केला पाहिजे.

**आत्महत्येचे पारंपारिक कारणे :**

१) **भौगोलिक कारणे** : भौगोलिक घटकात हवामान,ऋतू, तापमान, पर्जन्यमान या भौगोलिक घटकांचा आत्महत्येशी संबंध असल्याचे अनेक विचारवंतानी मान्य केले.

२) **अनुवंश किंवा जैविक कारणे** : वंश असा समूह असतो की, ज्याची शारीरीक लक्षणे समान स्वरूपाची असतात. व ती अनुवंशावर आधारित असतात.गॉल आणि एस्वीकरोल यांच्या मते, अनुवंशिक गुण व्यक्तिला आत्महत्येस प्रवृत्त करतात.

३) **मानसिक कारणे** : माणसिक कारणांत प्रामुख्याने वेडेपणा, शारीरीक दोष यांचा समावेश होतो. मतिमंद व्यक्ति भीती, संकट, अपमान यांपासून मुक्त होण्यासाठी व मृत्युची मानसिक वासना असलेल्या व्यक्ति आत्महत्या करतात.बार्डीनच्या मते, वेडेपणा व आत्महत्येचा संबंध असून यामुळे स्वत:च स्वत:ला संपविण्याची इच्छा होते. अश्या व्यक्तिच्या भावनात्मक संवेगाचा वेग जास्त असतो.

४) **अनुकरण** : अनुकरण ही मानसिक प्रक्रिया व पुनरावृत्ती आहे. ही संक्रमित रोगाप्रमाणे पसरते. गॅब्रिअल टार्डे या मानसशास्त्राच्या मते, अनुकरणामुळे आत्महत्या घडते.

**डरखिमने सांगितलेली कारणे** : डरखिमने आपल्या आत्महत्येच्या सिध्दांतात पारंपारिक मानसशास्त्रीय, अनुवंशिक व भौगोलिक कारणे नाकारली व त्यांनी अहंवादी, परार्थवादी आणि प्रमाणशून्यता या कराणांचा समावेश केला.

१) **आत्मकेंद्रितता** : आत्मकेंद्रितता म्हणजे स्वत:चाच किंवा स्वत:च्या सुखाचा विचार करण्याची प्रवृत्ती होय. म्हणून अशा व्यक्ति जीवनाचा त्याग करण्यासाठी आत्महत्येला परावृत्त होतात.

२) **परहित केंद्रितता** : परहित केंद्रितता म्हणजे दुसऱ्याच्या हिताचा विचार करण्याची प्रवृत्ती होय. या कारणानुसार व्यक्ति स्वत:च्या हिताकडे दुर्लक्ष करते. आणि सामुहिक हितासाठी आत्मबलिदान करते.

३) **प्रमाणशून्यता** : प्रमाणशून्यता म्हणजे नियमांचा अभाव अर्थात सामाजिक नियमावरील निष्ठेचा अभाव म्हणजे नियमहिनता होय. डरखिमने आर्थिक चढउतार आणि व्यावहारिक विघटन असे दोन प्रकारच्या नियमहिनतेचा विचार मांडला.

४) **सामाजिक नियंत्रणाची शिथिलता** : सामाजिक नियंत्रणामुळे व्यक्ति आपल्या भावना आणि मनावर नियंत्रण ठेवू शकते. परंतु सामाजिक नियंत्रणाचा अभाव व्यक्तिस आत्महत्येस प्रवृत्त करतो.

५) **नकारात्मक सामाजिक दबाव** : बिकट परिस्थिती व्यक्तिला नकारात्मक दबाव निर्माण करते. त्या दबावामुळे व्यक्ति आत्महत्या करतात.

६) **सामाजिक संघटना आणि सामाजिक एकता** : डरखिमच्या मते, सामाजिक संघटना आणि आत्महत्या यांचा घनिष्ठ संबंध आहे. ज्या समाजात सामाजिक एकता जास्त असते त्या समाजात आत्महत्येचा कल कमी असतो. परंतु जेथे सामाजिक एकतेचा अभाव असतो तेथे आत्महत्येचा दर वाढतो.

७) **मूल्य संघर्षाचा परिणाम** : सामाजिक मूल्ये समाजात शिस्त आणि एकसंघता कायम ठेवतात. परंतु मुल्यामध्ये संघर्ष असेल तर समाजात एकता राहत नाही. म्हणुन आत्महत्या करण्याकडे कल वाढतो. ७) पारंपारिक विश्वास दुर्बल होणे ८) सामाजिक एकता नष्ट होणे ९) व्यक्तिवादात वाढ १०) निराशावादी वातावरण ११) बिकट सामाजिक अवस्था १२) समाजबंधाचे शिथिलीकरण १३) व्यावहारिक नियमांची दुर्बलता, असमायोजन, कुटुंबाचे विघटन, सामाजिक परिवर्तन, धर्म, युध्द, साक्षरता इ. वरील कारणामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढते, असे डरखिमचे मत आहे.

**तरूणांना आत्महत्येस प्रवृत्त करणारी कारणे** : आत्महत्येची अनेक कारणे असली तरी, युवा पीढीमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढ असण्यामागची व त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणारी प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत. १) शैक्षणिक परिस्थिती २) पाल्यांची बौध्दिक कुवत व पालकांच्या उपेक्षा यातील तफावत ३) जीवघेणी स्पर्धा परीक्षा ४) पिस्तूल, बंदूक, विषारी औषध यांसारख्या साधनांची सहज उपलब्धता ५) प्रेमातील असफलता, अडथळे ६) रॅगींग ७) मादक पदार्थांचे व्यसन ८) ब्लॅकमेल ९) हेवेदावे—ईर्षा १०) फसवणुक ११) नैराश्य १२) भेदभाव १३) अत्याचार १४) प्रिय व्यक्तिचा मृत्यु १५) दिर्घ व गंभीर आजार १६) बदनामी १७) गैरसमज १८) जगणेच असाह्य होऊ लागल्याची भावना १९) ताणतणाव २०) कौटंबिक विघटन २१) एकटेपणा २२) आर्थिक नुकसान २३) अंधविश्वास २४) बेकारी २५) शारीरीक व्यंग २६) मानसिक आजार २७) सामाजिक बंधने २८) आर्थिक तफावत २९) जातिभेद, वंशभेद व लिंगभेद ३०) प्रतिष्ठा ई. कारणा व्यतिरिक्त तरूणांना आत्महत्येस प्रवृत्त करण्यासाठी वैयक्तिक आणि सभोवतालचे अनेक घटक सुध्दा जबाबदार आहेत.

**तरूणांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना** :

तरूणांच्या आत्महत्या रोखण्यासाठी जागतिक व देशपातळीवर प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असल्यामूळे पुढील उपाययोजना उपयुक्त ठरतील

- पालकांच्या अपेक्षा, मुलांची इच्छा,महत्वकांक्षा किंवा त्यासाठी सक्षम नसलेल्या मुलांवर मानसिक दबाव टाळावा.
- पालकांनी आपल्या मुलाचा दुसऱ्या मुलांशी तुलना करूण भेदभाव न करता आपल्या मुलाचा आत्मविश्वास वाढवण्याची गरज आहे.
- घरी किंवा मित्रांमध्ये किती वेळ देतो? मित्र कसे आहेत? याकडे पालकांनी लक्ष ठेवणे आवश्यक आहे.
- प्रत्येक शाळा, महाविद्यालय पातळीवर माणसशास्त्रज्ञ असणे आवश्यक आहे.
- शाळा महाविद्यालयातील रॅगींग गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शासनाने कडक शिक्षा व जास्त दंड लादणे आवश्यक आहे.
- युवा पीढीने नेहमी बहिर्मुख असावे, जास्त वेळ एकांतवासात विचार करीत बसु नये.
- तरूणांने आपल्या बाबतीत जे घडले आहे ते आपल्याच बाबतीत पहिल्यांदा घडलेले नसून ते इतरांच्याही सोबत घडलेले असते याची जाणीव ठेवावी व घडणारा प्रत्येक प्रसंग गांभीर्याने मनावर घेऊ नये.
- तरूण कुटुंबात,महाविद्यालयात,समाजात व इतर ठिकाणी सदैव गोंधळलेली,एकलकोंडी,दैनंदिन जीवनापासून दुर्लक्षित राहणारे याकडे पालकांनी व शिक्षकांनी गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.
- सामाजिक परिस्थिती बदलने आपल्या हातात नाही पण कौटुंबिक वातावरण सुदृढ ठेवणे तर आपल्या हातात आहे. त्यासाठी घरातील सदस्य, पालक मुलांमधील संवादाची नवीन काळाप्रमाणे नवीनशैली पुर्वीची तक्रारी शैली बदलुन चर्चात्मकशैली आत्मसात करणे आवश्यक आहे.
- युवापीढीला शाळा, महाविद्यालयामध्ये ताणतणावाचे नियोजन, लैंगिक शिक्षण, करियर मार्गदर्शन इत्यादीचे प्रशिक्षण मिळने गरजेचे आहे.
- पलक मुलातील संबंध व सक्षम पालकत्व याविषयी शैक्षणिक संस्थानी कार्यशाळेचे आयोजन करूण मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.
- जगभरात १० सप्टेंबर हा दिवस जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन म्हणुन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने शाळा, कॉलेज, महाविद्यालय, विद्यापिठात परिषदा, कार्यशाळा चर्चासत्राचे आयोजन करून आत्महत्या प्रवृत्ती विराधात प्रतिबंधात्मक उपाय योजना करणारे उपक्रम राबवावेत.
- स्वत:चा विचार करण्यापेक्षा माझे कुटुंब, माझा परिवार, माझा समाज, माझा देशासाठी माझा काहीतरी उपयोग झाला पाहिजे. ही भावना तरूणांच्या मनात रूजवने आवश्यक आहे.
- वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक, रिॲलिटी शो, टी.व्ही. इ. शोशल मिडियाच्या माध्यमातून आत्महत्येचे परिणाम समाजापुढे मांडावेत व जनजागृत्ती करणे आवश्यक आहे.

- पालकांनी आपल्या मुलामधील नकारात्मक बदल, वर्तनातील बदल, अभ्यासातील प्रगती वेळीच समजुन माणसोपचार तज्ञ, समोपदेशक यांची मदत घेणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

१) परिक्षेतील अपयशाची उदासिनता आत्महत्येस प्रवृत्त करते. २) प्रिय व्यक्तिचा विरह तरूणांना आत्महत्येस प्रवृत्त करतो. ३) अपराधीपणाची भावना तरूणांना आत्महत्येस प्रवृत्त करते. ४) भावनिक तरूणांमध्ये आत्मघाती प्रवृत्ती अधिक असल्याचे दिसून येते. ५) प्रेमातील नकार व बंधने तरूणांना आत्महत्येस प्रवृत्त करतात. ६) ब्लॅकमेलिंग व फसवणुक झाल्याने तरूणांमध्ये आत्महत्या घडून येतात. ७) ८) अपमानीत झाल्याची भावना तरूणांना आत्महत्येस प्रवृत्त करते. ९) बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास तरूण असमर्थ ठरत आहेत.

## संदर्भ ग्रंथसूची :

१) आगलावे प्रदिप (२००६) : 'अभिजात समाजशास्त्रीय विचारवंत' साईनाथ प्रकाशन, नागपुर.

२) कुलकर्णी पी.के. (२००८) : 'सामाजिक विचार प्रवाह' श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर.

३) आशा परूळेकर (२०१०) : 'आत्महत्या का घडतात?' उन्मेश प्रकाशन,पुणे

४) जोशी लक्ष्मणशास्त्री (१९७६) : 'मराठी शब्दकोश खंड—४' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई.

५) प्रा. मनोहर तोटरे (२००७) : 'समाजशास्त्र' विद्याभारती प्रकाशन

६) वैद्य नी.सी. (१९८७) : 'सामाजिक विचारवंत' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,नागपुर.

७) प्रा.डॉ. डि.एम. तंगलवाड : समाजशास्त्रीय विचारवंत

८) प्रा. डॉ. सुनील मायी : 'व्यक्ति आणि सामाजिकता' डायमंड पब्लिकेशन,पुणे.

९) Suicide (1897) :- Emile Durkhiem

१०) Rajiv Radhakrishnan and Chittaranjan Andrade : suicide An Indian Perspective (www.ncbi.com)

११) Dr.Yunus Saba: increasing suicide tendency among youth (ICBSA-14) march 26-27.2014 kvala Lumpur (Malasis)

१२) Article (2017)– Risk Factors for Suicidal Attempts Among Lower (www.igpn.info)

**श्री. वाघमारे मारोती देविदास**

१३) Miss. Mrudual Mahajan (2016): Suicidal Tendencies amongst Adolescents (www.ijltemas.in) १४) Suicide.irg

१५) Suicide Wikipedia.org

१६) Economic and Political weekly (2017)

१७) Indian sociolical Bulletin